No. CIDCO/CBD/SE(HQ)/2016/1 

Date : 04/08/2016

# CIRCULAR

Sub. : Implementation of Green Building Concept.

Ref. : PWD/GR No. BDG 2016/A.No.133/BLDG.-2 dated 08/07/2016

The Government of Maharashtra vide G. R. under reference has given directives to implement the Green Building concept while planning and designing of the buildings as well as in the major repairs works of existing important/special buildings. A copy of above referred G.R. which is self-explanatory is enclosed herewith for reference. All the concern are requested to take note of the content of the said G.R.

This issues as directed by CA (NT).

Encl. : Copy of above referred G.R.

04.08.2016

SE (HQ)
S. G. Rokade / 22783

Separately to:

All SEs (                )

CC to:

ACE(I) / ACE(II) : for information please.

ACA/CP : for information please.

CE(NM) / CE(NMIA) / CE(SP) : for information please

5/8/16

महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील इमारत प्रकल्पांकरिता "हरित इमारत संकल्पना" (Green building Concept) राबविणेबाबत..

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
शासन निर्णय क्र. बीडीजी २०१६/प्र.क्र.१३३/इमारती-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ८/७/२०१६

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील विविध भागांच्या इमारती सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बांधण्यात येतात. सद्य:स्थितीत या सर्व शासकीय इमारतींचे नकाशे व आराखडे महाराष्ट्र शासनाच्या वास्तुशास्त्रज्ञांमार्फत प्रचलित पध्दतीने तयार करण्यात आले आहेत/येतात.

२. जागतिक स्तरावर अत्याधुनिक पध्दतीने मोठमोठे इमारत प्रकल्प उभारण्यात येतात. त्यामुळे बांधकाम क्षेत्रात पर्यावरणासाठी मोठे आव्हान ठरत आहे. इमारत प्रकल्पांचे बांधकामाच्या वेळी सर्वसाधारणपणे ४० टक्के उर्जेचा वापर होतो. तसेच इमारत बांधकामाच्या विविध क्रियांमुळे अंदाजे ५० टक्के हवेचे व पाण्याचे प्रदूषण तसेच ४२ टक्के हरित वायू विसर्जन व जवळपास ५० टक्के क्लोरोफल्युरोकार्बन्सची निर्मिती होते.

३. आजच्या प्रगत युगात मोठमोठे निवासी व व्यापारी इमारत संकुले उभारण्यात येत आहेत. यामुळे सदर इमारतीतील उर्जेचा वापर मोठया प्रमाणात वाढला आहे. एकूण वीजेच्या मागणीपैकी ५० टक्क्याहून अधिक वीजेचा वापर विविध इमारतींमध्ये दैनंदिन गरजांसाठी होत आहे. यामुळे वीजेचे भारनियमन करणे बंधनकारक झाले आहे.

४. वाढत्या शहरीकरणामुळे तसेच बांधकाम व्यवसायातील स्पर्धेमुळे इमारतींच्या दिखाऊपणास अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे. यामुळे आवश्यकता नसतानाही पर्यावरणावर प्रतिकूल परिणाम होणा-या संकल्पना पुढे येत आहेत. परिणामी वातानुकूलन यंत्रणा तसेच अंतर्गत प्रकाशासाठी जास्त उर्जेचा वापर होत आहे. तसेच अंतर्गत सजावटीसाठी घातक वायू निर्माण होणा-या साधनांचाही वापर करण्यात येत आहे.

५. उपरोक्त सर्व बाबींमुळे एकूणच वीजेचा वापर मोठया प्रमाणावर वाढला आहे. त्यानुषंगाने अतिरिक्त वीजनिर्मिती करणे आवश्यक झाले असून त्याकरिता होणारा खर्चही मोठया प्रमाणात जास्त आहे. सध्याची एकंदरीत आर्थिक स्थिती पहाता वीजनिर्मितीकरिता होणा-या खर्चामुळे अर्थव्यवस्थेवर अतिशय ताण पडण्याची शक्यता आहे व हे परवडण्याजोगे नाही. त्यामुळे वीज बचत हा एकमेव पर्याय शिल्लक राहतो व त्यादृष्टीने **"हरित इमारत संकल्पनेचा"** (Green building Concept) विचार करणे क्रमप्राप्त झाले आहे. यानुषंगाने पर्यावरणाचे संतुलन राखणे तसेच नैसर्गिक उर्जास्रोतांचा वापर इमारतींच्या प्रकल्पांमध्ये समावेश करणे अत्यावश्यक आहे.

६. वरील सर्व वस्तुस्थिती पहाता, महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील विविध नवीन इमारतींचे संकल्पन **"हरित इमारत संकल्पनेचा"** (Green building Concept) वापर करुन नकाशे व आराखडे तयार करणेच्या दृष्टीने धोरणात्मक निर्णय घेणे शासनाच्या विचाराधीन आहे.

७. त्याचप्रमाणे अस्तित्वातील महत्त्वाच्या इमारतींचे मोठया प्रमाणावर दुरुस्ती हाती घेण्यात येणा-या कामांमध्येही **"हरित इमारत संकल्पनेचा"** (Green building Concept) लक्षात घेऊनच कामे हाती घेणे अपेक्षित आहे.

**शासन निर्णय :-**

वरील प्रस्तावनेत नमूद केलेल्या परिस्थितीचा विचार करुन यापुढे इमारत प्रकल्पांचे नकाशे व आराखडे तयार करताना खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे :-

(अ) महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील सर्व **इमारतीचे संकल्पन "हरित इमारत संकल्पनेचा" (Green building Concept)** वापर करुन नकाशे व आराखडे तयार करावेत.

(ब) अस्त्त्वातील **महत्त्वाच्या इमारतींचे** मोठया प्रमाणावर दुरुस्ती हाती घेण्यात येणा-या कामांमध्येही "हरित इमारत संकल्पनेचा" (Green building Concept) लक्षात घेऊनच दुरुस्तीविषयक उपाययोजना कराव्यात.

(क) पर्यावरणाचे संतुलन राखणे तसेच नैसर्गिक उर्जास्रोतांचा वापर इमारतींच्या प्रकल्पांमध्ये समावेश करणेबाबत नियोजन करावे.

(ड) संबंधित मुख्य **अभियंता यांनी हरित इमारती** बांधकामानंतर त्या इमारतींचे परिरक्षण (Audit) हे Leeds **अथवा** IGBC सारख्या मान्यताप्राप्त संस्थांकडून करुन घ्यावे व त्यांचे प्रमाणपत्र उपभोक्ता विभागाकडे पाठवावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१६०७०८१५५५१६७३१८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay Uttarwar

Digitally signed by Sanjay Uttarwar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=DY ENGR AND DESK OFFICER, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ecab21a54ad660ded981a3eca613 80e321a245c3a783fa22e29d3e1080185a6 83, cn=Sanjay Uttarwar
Date: 2016.07.08 16:04:55 +05'30'

**( सं.मु.उत्तरवार )**
**कार्यासन अधिकारी**

प्रत,

१. मंत्रालयीन सर्व विभाग.
२. अ.मु.स (सा.बां)/सचिव (रस्ते)/सचिव (बांधकामे), सा.बां.विभाग, मंत्रालय
३. सर्व मुख्य अभियंते, सा.बां.प्रा.विभाग व (विद्युत) विभाग
४. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र, राज्य, मुंबई
५. सर्व अधीक्षक अभियंते, सा.बां.मंडळ व (विद्युत) मंडळ
६. सर्व कार्यकारी अभियंते,सा.बां.विभाग व (विद्युत) विभाग
७. संचालक, उपवने व उद्याने, मुंबई
८. सर्व अधिकारी व कार्यासन अधिकारी, सा.बां.विभाग, मंत्रालय
९. निवडनस्ती (इमारती-२ कार्यासन).